International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# जननायक बिरसा मुंडा यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान

**प्रा. डॉ. दिलीप काठोडे**
*सहयोगी प्राध्यापक.*
*जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, सिडको, नवीन नांदेड.*
*Corresponding Author – प्रा. डॉ. दिलीप काठोडे*
**DOI - 10.5281/zenodo.17656866**

**सारांश:**

*डोंगर दर्यात आणि जंगलात आदिवासी लोक हजारो वर्षापासून आनंदाने आपल्या संस्कृतीची जोपासना करत आपले जीवन जगत आलेले होते. ब्रिटिशांनी जंगल कायदा करून हजारो वर्षाची आदिवासींची चांगली व्यवस्था मोडली. मूलनिवासी असलेल्या आदिवासी समाजाला आपल्या जमीन हक्क अधिकारापासून वंचित केले, यातून मुक्तता मिळविण्यासाठी जननायक बिरसा मुंडा यांनी आदिवासींना एकत्र करून आपले हक्क अधिकार मिळण्यासाठी इंग्रजा विरुद्ध बंड पुकारून सशस्त्र लढा दिला. त्यांनी आदिवासी समाजाचे नेतृत्व केले. उलगुलान आंदोलन करून आदिवासींचे अस्तित्वाची जाणीव ब्रिटिशांना करून दिली. तसेच त्यांनी आदिवासी समाजात अंधश्रद्धा निर्मूलन करून सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी आपले युवा अवस्थेत ब्रिटिशांच्या सोबत युद्ध केले. भूमिगत राहून स्वातंत्र्याची आंदोलन चालवले म्हणून त्यांना धरती आबा असे म्हणतात हा महान स्वातंत्र्य योद्धा आजअमर भारतात झाला.*

**प्रस्तावना:**

भारतात हजारो वर्षांपासून असलेल्या गुलामगिरीतून भारतीय समाजाला मुक्त करण्याचे श्रेय भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्यवीरांना जाते. त्यांनी आपल्या जीवाचे, आयुष्याचे बलिदान देऊन आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून दिले. स्वातंत्र्यलढा हा परकीय सत्तेविरुद्ध भारतीय स्वातंत्र्यविरोधी दिलेला प्रदीर्घ लढा होता. या लढ्यात समाज सुधारक, शेतकरी, आदिवासी यांनी आपले योगदान दिले. त्याचबरोबर जहाल मतवादी व मवाळ मतवादी नेत्यांनी स्वातंत्र्यलढा दिला. आज पर्यंत जंगलात राहणाऱ्या आदिवासी ची जंगलावर मालकी होती ते जंगलात मुक्तपणे राहत होते. जंगलातील साधन संपत्तीवर ते आपल्या उदरनिर्वाह करत आलेले होते. ब्रिटिशांनी 1878- 79 साली जंगल कायदा करून जंगल आपल्या ताब्यात घेतले. या कायद्यामुळे जंगलातील राहणारी आदिवासी जमात निराधार झाली. जंगलातील साधन संपत्ती तोडण्यास आदिवासीवर दंड आकारण्यात येऊ लागला. त्यांना शिक्षा होऊ लागली. यातून आदिवासींच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. सावकार लोक त्यांच्याकडून स्वस्त भावात वस्तू घेऊन जास्त भावात आदिवासींना वस्तू विकत असे , बिरसा मुंडा यांचा जन्म कुलीहातू गावी झाला 15 नोव्हेंबर 1875 सली वडील सुगनामुंडा व आई करमीमुंडा

यांच्या पोटी झाला. पुढे त्यांनी सलमा गावात शिक्षण घेतले. त्यानंतर 1894 साली "1878 च्या भारतीय वन कायद्याच्या" विरोधात त्यांनी ब्रिटिशांना निवेदन दिले. याचा कोणालाच फायदा झाला नाही इथूनच बिरसा मुंडा यांनी ब्रिटिशाविरुद्ध लढा देण्यास सुरुवात केली.

**अध्ययन विषयाचे उद्देश :**

1) भारतीय स्वातंत्र्य लढ्याची संकल्पना अभ्यासणे.
2) जननायक बिरसा मुंडा यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान अभ्यासणे.

**अध्ययन पद्धती :**

अध्ययन विषयाची सखोल माहिती मिळण्यासाठी सदरील उद्देश समोर ठेवून दुय्यम साधनांचा वापर करण्यात. आला त्या संदर्भ ग्रंथ, मासिके, पुस्तके, इंटरनेट यांच्या साह्याने विचाराची मांडणी करण्यात आली आहे जननायक बिरसा मुंडा यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाचा गौरव व्हावा यासाठी सदरील विषयाची मांडणी करण्यात आलेली आहे.

**भारतीय स्वातंत्र्य लढ्याची संकल्पना :**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात केवळ परकीय सत्तेला भारताबाहेर हाकलून लावणे, एवढेच मर्यादित नव्हते तर देशातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय अशा सर्वच क्षेत्रांमध्ये पूर्ण स्वराज्य मिळणे हा एकमेव उद्देश होता. इंग्रजांच्या परकीय सत्तेपासून भारताला मुक्त करून स्वतःचे राज्यकारभार चालवणे हा होता. स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे ही घोषणा लोकमान्य टिळकांनी दिली देशात असलेल्या जातीभेद अस्पृश्यता स्त्री-पुरुष असमानता दूर करून, समानतेवर आधारित समाज निर्माण करणे हे महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांनी सामाजिक स्वातंत्र्याची बाजू मांडली. इंग्रजांच्या आर्थिक शोषणातून देशाला मुक्त करून स्वदेशी उद्योग व्यवसाय शेतीला चालना दिली. भारतीय परंपरा भाषा कला संस्कृतीने पुनर्जीवन करून आत्मसन्मान मिळवण्यासाठी स्वातंत्र्यलढाणा दिला गेला. राजाराम मोहन राय, स्वामी विवेकानंद, दयानंद सरस्वती यांनी विचाराला बळ दिले प्रांत, भाषा, धर्म या पलीकडे जाऊन संपूर्ण भारत एक राष्ट्र म्हणून उभा केला. भारताला एकात्मतेचे प्रतीक मानले गेले. संपूर्ण स्वराज्य मिळून लोकशाही स्थापन केली. हे केवळ स्वातंत्र्याचे आंदोलन नव्हे तर संपूर्ण राष्ट्रभारताची चळवळ होती. ही चळवळ भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या सर्व स्वातंत्र्यवीरांनी लढली आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले.

या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी समाजातील जननायक बिरसा मुंडा यांचे मोलाचे योगदान आहे आदिवासी समाजात जंगलात राहणारा समाज आहे. ते देशाचे मूळनिवासी आहेत बाहेरून आलेल्या लोकांनी आदिवासींचे प्रदेश घेतले आदिवासी समाजाने त्यांनी त्यांच्या संस्कृतीचे व मूल्य जपली आदिवासी लोक हे निसर्गावर प्रेम करणारे आहेत. भारतात ब्रिटिश कंपनीची राजकीय सत्ता येताच या देशातील लोकांवर विशेष करून आदिवासीवर अत्याचार व जुलमे झाली. इंग्रजांनी आपल्या फायद्यासाठी आदिवासींचे उदनिर्वाचे साधन असलेले वनसंपदा आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. यामुळे आदिवासी चिडले आणि इंग्रजांच्या धोरणाविरुद्ध सशस्त्र लढा आदिवासींनी इंग्रजांच्या विरोधात लढला गेला. आदिवासींनी आपल्या हक्क साठी अनेक आंदोलने केली त्यात मुंडा जमातीवर इंग्रजांनी अन्याय अत्याचार करून त्यांच्या

जमिनी लुटल्या. त्यामुळे मुंडा जमातीचे लोक चिडले व इसवी सन 1852 मध्ये इंग्रजाविरुद्ध मुंडाने उठाव केला याचे नेतृत्व पुढे जननायक बिरसा मुंडा यांनी केले.

**जननायक बिरसा मुंडा यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान :**

जननायक बिरसा मुंडा हे भारताच्या आदिवासी समाजातील एक महान क्रांतिकारी व स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांनी वयाच्या अवघ्या 25 व्या वर्षात ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा दिला त्यांना धरती आबा म्हणूनही ओळखले जाते. त्यांच्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान पुढील प्रमाणे आहे

**1) आदिवासी समाजाचे नेतृत्व:**

बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाला संघटित करून त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय विरुद्ध तयार केले. त्यांनी आदिवासींना हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी व जंगल वाचवण्यासाठी ब्रिटिशाविरुद्ध सशस्त्र लढा उभा केला. 1894 साली भारतीय वन कायद्याविरोधात निवेदन दिले. त्याचा फायदा झाला नाही या घटनेतून त्यांनी निर्णय घेतला की स्वतः पुढाकार घेऊन आदिवासी समाजासाठी लढावे लागेल. ब्रिटिशा विरुद्ध लढायचे असेल तर युद्धाचे कौशल्य आत्मसात करण्याची गरज पडेल. आपल्या आंदोलनाचा भाग म्हणून येथील व्यवस्थेला त्यांनी नकार दिला. आदिवासी समाज बिरसा मुंडा ला आपला मूकनायक म्हणू लागले बिरसा मुंडा कडे आदिवासी लोकांच्या झुंडीच्या झुंडी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी येत होत्या. बिरसाला वाटले होते की आपले मुख्य शत्रू इंग्रज, जमीनदार, सावकार ही मंडळी आहेत त्यांनी आदिवासींचे शोषण केले. या विरुद्ध त्यांनी आवाज उठवला सशस्त्र लढा दिला. जंगल जमिनीचे मालक आदिवासी आहेत.ही माहिती ब्रिटिशांना कळाली.

**2) उलगुलान आंदोलन:**

उलगुलान म्हणजे विद्रोह, हा विद्रोह त्यांनी ब्रिटिश सत्यविरूद्ध केला आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड पुकारले. फेब्रुवारी 1898 मध्ये बिरसा मुंडा यांनी डोमवारी येथे सभा बोलावली त्यात इंग्रजा विरुद्ध लढाई करण्याचे ठरले. बिरसा मुंडांनी हिंसेचा मार्ग स्वीकारून 25 डिसेंबर 1899 पासून बिरसा मुंडाणे आंदोलने सुरू केली या मुक्ती आंदोलनाला मुंडारी भाषेत उलगुलान म्हणतात. जमीनदार, पादरी,महाजन, बनिया यांच्या हस्ते पासून उलगुलाणला सुरुवात झाली.

**3) जंगल जमीन हक्कासाठी लढा:**

ब्रिटिशांनी जमीनदारी व्यवस्था भारतात आणली आदिवासींची जंगल जमीन जमीनदारांच्या व सावकारांच्या तब्येत दिली. जननायक बिरसा मुंडा यांनी या विरोधात ब्रिटिशांच्या या धोरणाविरोधात मोठी तीव्र आंदोलन केले. जंगल जमिनीवरील आपले हक्क वाचवण्यासाठी बिरसा मुंडा ने आदिवासींना एकत्र केले आणि ब्रिटिश सरकार विरुद्ध तीव्र लढा दिला. बिरसा मुंडा यांनी आदिवासी लोकांना सांगितले की जमीन ही धरती आबाची आहे ती बाहेरी लोकांना देता येणार नाही. या आंदोलनाचा परिणाम असा झाला की छोटा नागपूर येथे आदिवासींचे जमीन हक्क मान्य करण्यात आले.

**4) आदिवासी समाजातील सामाजिक सुधारणा:**

जननायक बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजात असलेली अंधश्रद्धा व्यसनाधीनता व सामाजिक कुप्रथा दूर करण्याचा प्रयत्नही केला. बिरसा मुंडा यांनी आपल्या नव्या धर्माची सुरुवात करून प्रचार करीत त्यांनी आदिवासी समाजाने या नियमांचे पालन करावे असे सांगितले.1. चोरी करणे, खोटे बोलणे,

हत्या करणे अन्याय आहे.2. भिक्षा कोणीही मागू नये.3. बळी देणे, पूजा करणे बंद करावे.4. अनेक देवी देवतांची पूजा करू नये.5. भूत, प्रेत, हडळ, पिशाच्च यावर विश्वास ठेवू नये. 6. मद्यपदार्थांची सेवन बंद करावे.7. मुंग्याप्रमाणे सतत परिश्रम करावे.8. पशु प्राण्याप्रमाणे एकजुटीने जीवन जगावे.9. सर्वांवर प्रेम करावे.

या नियमांचे पालन आदिवासी समाज करू लागला यातूनच आदिवासींची एकतेची भावना निर्माण झाली.

**5) ब्रिटिशाविरुद्ध युद्ध:**

जननायक बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाने अनेक ठिकाणी ब्रिटिशाविरुद्ध लढा दिला गेला. ब्रिटिशांच्या सरकारी कार्यालयावर, पोलीस ठाण्यावर व जमीनदारावर हल्ले केले. यामुळे ब्रिटिश सरकार हादरले होते. यामुळे बिरसा मुंडा ला अटक करण्याचे आदेश ब्रिटिशांनी दिले. अटक करण्यासाठी तामाडाचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी बिरसा मुंडांना पकडण्यासाठी गेले परंतु बिरसा यांच्या अनुयायांनी पोलिसांना हाकलून लावले. त्यानंतर राचीचे डेप्युटी कमिशनर स्वतः बिरसा ला भेटले आणि म्हणाले तुम्ही मला वचन द्या की पुढे गडबड करणार नाही. यावर बिरसांनी सांगितले की मी कधीच कुणाला चेतावणी दिली नाही. खरे काय ते लोकांना सांगायचे माझे कर्तव्य आहे व ते मी करणारच. यानंतर मुक्तिसंग्रामात सशस्त्र हाती घ्यावी लागतील. बिरसा मुंडांचे आंदोलन भूमिगत होऊन जास्त त्याला गती मिळाली. 24 डिसेंबर 1899 च्या रात्री राची पासून चाइबासापर्यंत विस्तीर्ण भागात पोलीस चौकी, चर्च, इंग्रज अधिकाऱ्यांचे निवासस्थान यावर अंधारात धनुष्यबाणांचा जोरदार वर्षाव केला. सर्व ब्रिटिश यंत्रणा गोंधळात पडली. 7 जानेवारी 1900 मध्ये धनुष्यबाण, कुराडी या साह्याने बिरसा मुंडांच्या आंदोलकांनी खुटी पोलीस ठाण्यावर आक्रमण केले. तेथील बंदूकधारी पोलीस पळून गेले. तेथील पोलीस चौकीला जाण्यात आले. या घटनेनंतर ब्रिटिश जागी झाले. ब्रिटिशांना भीती वाटू लागली. यातून ब्रिटिशांनी डोमबारी संहार केला.

**6) भारत देशासाठी बलिदान दिले:**

डोमबारी संहारानंतर बिरसा मुंडा यांनी आदिवासी जनतेला जागृत करण्याचे कार्य सोडले नाही. इकडे ब्रिटिश सरकारने बिरसा मुंडाला जिवंत किंवा मृत पकडून देणाऱ्यास मोठे बक्षीस जाहीर केले. या बक्षिसाच्या लोभापाई जरीकेल गावातील सात लोकांनी 3 फेब्रुवारी 1900 रोजी बिरसा मुंडा ला पकडून बनगाव डेप्युटी कमिशनर कडे आणले. बिरसा मुंडा च्या अटकेची बातमी सर्वत्र पसरली. बिरसा मुंडा लोकांना म्हणाले माझ्या सांगण्याप्रमाणे वागाल तर तुम्हाला तुमचे अधिकार मिळतील असा संदेश त्यांनी आपल्या अनुयायांना दिला. तुरुंगात 9 जून 1900 रोजी ते शहीद झाले.

**निष्कर्ष :**

जननायक बिरसा मुंडा यांचे आंदोलने आदिवासी समाजाच्या हक्क अधिकारासाठी व भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी होते. भारत देशात जंगलाने व्यापलेला देश होता. डोंगरदऱ्यात आदिवासी लोक हजर वर्षे पासून आपली संस्कृतीची जोपासना करत आले होते. जंगल कायदा करून ब्रिटिशांनी आदिवासींचे जगणे मुश्किल केले होते. आदिवासींचे उदरनिर्वाहाचे साधन ब्रिटिशांनी हिरावून घेतले. जंगलात राहणारी आदिवासी जमात निराधार झाली. हे बिरसा मुंडा यांच्या लक्षात आले नंतर त्यांनी ब्रिटिशाविरुद्ध बंड पुकारले आदिवासी लोकांना एकत्र करून सशस्त्र लढा त्यांनी दिला त्यांनी आंदोलने केली.

आदिवासी समाजात सुधारणा घडून आणल्या आणि आपले बलिदान देशासाठी दिले. कमी वेळात ब्रिटिश सरकारविरुद्ध आंदोलन करणारा ज्यांना एक बिरसा मुंडा ही धैर्यवान, शौर्यवान,वीर सुपुत्र भारतात जन्माला आला आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी आपले मोलाचे योगदान देऊन इतिहास घडविला. या महान स्वातंत्र्यवीर समोर आज सर्व भारत देश नतमस्तक होतो.

**संदर्भ ग्रंथ :**

1) भारतीय आदिवासी - डॉ गुरुनाथ नाडगोंडे.
2) आदिवासी महानायकांचे चरित्र - शेषराव मडावी
3) आदिवासी चळवळ स्वरूप व दिशा - दीपक गायकवाड
4) भारतीय स्वातंत्र्यलढा - डॉ अनिल गोडबोले
5) उलगुलान: बिरसा मुंडा आंदोलन - चित्रलेखा कौशल
6) वीर बिरसा मुंडा - डॉ वा ना मेश्राम
7) बिरसा मुंडा और उनका आंदोलन - कुमार सुरेश सिंह
8) क्रांतिकारी आदिवासी जननायक - प्रा गौतम निकम.